महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ५२ वा | दिनांक : १७/११/२०२४ | वार : रविवार

## धारावीची जमीन घेता, कुलाब्याची का घेत नाही?:राहुल गांधी यांचा मोदींना सवाल; म्हणाले - हे शक्य होणार नाही, इथे राहुल गांधी उभा आहे

**अमरावती :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मुंबईतील धारावीची जमीन उद्योगपती गौतम अदानी यांना देण्याच्या मुद्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. मोदी, शहा व भाजपच्या लोकांना धारावीची १ लाख कोटींची जमीन अदानींना द्यायची होती. त्यामुळेच त्यांनी महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे सरकार चोरले. तुमच्या डोळ्यांदेखत कोट्यवधी रुपये देऊन आमदारांची खरेदी केली गेली आणि हे सरकार पाडले गेले, असे ते म्हणालेत.

राहुल गांधी आपल्या अमरावती येथील सभेत बोलताना म्हणाले की, हे सरकार धारावीची जमीन घेते, पण कुलाब्याची का घेत नाही? कारण कुलाब्यात दलित, आदिवासी, ओबीसी व आदिवासी नव्हे तर श्रीमंत लोक राहतात. त्यामुळे त्यांनी गरिबांच्या धारावीची निवड केली. मी भूसंपादन कायद्यावर भाष्य केले तेव्हा अदानी व अंबानींचे लोक माझ्या मागे लागले. माझी प्रतिमा मलीन करण्यात आली. मला बदनाम केले गेले. यासाठी कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करण्यात आली. धारावची कोट्यवधी रुपयांची जमीन उद्योगपतींच्या घशात जात असेल, तर तेवढेच पैसे गरिबांच्या खिशात गेले पाहिजे.

सरकार व उद्योगपतींना गरिबांची जमीन पाहिजे, पाणी पाहिजे, जंगल पाहिजे. त्यांना तुमच्याकडील सर्वकाही हवे आहे. देशात निवडक २५ अब्जाधीश आहेत. या सरकारने त्यांना १६ लाख कोटींचे कर्जमाफी दिली. आम्ही याऊलट शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ दिला होता. अदानींना धारावीत १ लाख कोटी रुपये दिले जाणार आहेत. त्यांना वाटते हे सहज शक्य होईल. पण असे होणार नाही. कारण इथे राहुल गांधी उभा आहे, असेही राहुल गांधी यावेळी मोदी सरकारला इशारा देत म्हणाले.

ते पुढे म्हणाले, अब्जाधीशांचे १६ लाख कोटी रुपये माफ करण्याचे संविधानात कुठे लिहिले आहे? संविधान हे शिवाजी महाराजांचे आहे. आज शिवाजी महाराज असते तर त्यांनी स्वतःचे बलिदान दिले असते, पण गरीबांच्या जमिनी जाऊ दिल्या नसत्या. धारावीची जमीन जाऊ देऊ दिली नसती. त्यांनी या जमिनीचे संरक्षण केले असते.

मोदी, शहांनी सर्वांच्या डोळ्यांदेखत कोट्यवधी रुपये देऊन आमदार खरेदी केले. त्यानंतर महाविकास आघाडीचे सरकार पाडले. या प्रकरणात दिलेले पैसे आकाशातून पडले नव्हते. भारतात कुणीही कुणाला ४०-५० कोटी रुपये देत नाही. या प्रकरणात धारावीच्या जमिनीचा सौदा झाला. या जमिनीच्या मोबदल्यात आमदारांना कोट्यवधी रुपये देण्यात आले. हे पैसे कुणी दिले, आदेश कुणी दिले हे अवघ्या देशाला माहिती आहे. यामागे कोण होते हे महाराष्ट्रातील ६ वर्षांचा मुलगाही सांगेल. या प्रकरणी कुणालाही काही सांगण्याची गरज नाही, असे राहुल गांधी म्हणाले.

राहुल गांधी यांनी यावेळी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आले तर महिलांना दरमहा ३ हजार रुपयांचे अर्थसहाय्य करण्याचेही आश्वासन दिले. महाराष्ट्रात आमचे सरकार आले तर डिसेंबरच्या पहिल्या तारखेला तुमच्या खात्यात ३ हजार रुपये आलेले असतील. मोदी उद्योगपतींच्या खात्यांत पैसे टाकतात. पण आम्ही सर्वसामान्य महिलांच्या खात्यांत पैसे टाकू, असे ते म्हणाले.

## मराठा समाजाला विरोध करणाऱ्यांना पाडा : मनोज जरांगे



**नाशिक :** मराठा आंदोलक यांनी शनिवारी ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्या येवला मतदारसंघात सभा घेऊन मराठा समाजाला विरोध करणाऱ्या दोघांना निवडणुकीत पाडण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी कुणाचे नाव घेतले नाही. पण त्यांचा रोख मंत्री छगन भुजबळ व त्यांचे पुतणे समीर भुजबळ यांच्याकडे होता हे स्पष्ट आहे.

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर आली आहे. त्यामुळे राजकीय प्रचाराला वेग आला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी शनिवारी छगन भुजबळ यांच्या येवला मतदारसंघातून आपल्या दौऱ्याला सुरुवात केली. त्यात त्यांनी इथे दोघांना पाडा असे आवाहन केले. यावेळी त्यांनी कुणाचे नाव घेतले नाही. पण त्यांचा रोख छगन भुजबळ व त्यांचे पुतणे समीर भुजबळ यांच्याकडे होता असा दावा केला जात आहे.

छगन भुजबळ हे येवला - लासलगाव मतदारसंघातून मैदानात आहेत. त्यांना राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या माणिकराव शिंदे यांनी आव्हान दिले. तर समीर भुजबळ हे नांदगाव - मनमाड विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत. त्यांचा सामना महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार तथा विद्यमान आमदार सुहास कांदे व ठाकरे गटाचे उमेदवार गणेश धात्रक यांच्याशी आहे. या तिरंगी लढतीकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे.

मनोज जरांगे म्हणाले की, येवल्याला ही माझी सांत्वनपर भेट आहे. हे गाव आता आमच्या रस्त्यात आले. त्याला आता मी बाजूला सारू का. मी इथे कुणाला पाडायचे हे सांगण्यास आलो नाही. पण येथील मतदारांनी मराठा समाजाला विरोध करणाऱ्यांना पाडावे. आता त्यामुळे कुणी पडत असेल तर त्यात माझा काय दोष?

येवल्यात विशेष असे काहीच नाही. हा मतदारसंघ काही राज्याबाहेर नाही. माझ्या पोटात एक आणि ओठात एक असे नाही. मी ठरवले की डायरेक्ट कार्यक्रम करतो. आता एक माईक जुना झाला म्हणून दुसरा हातात घेतला. पण तो ही सारखा सारखा बिघडत आहे, असे ते म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे मनोज जरांगे यांचे येवल्याच्या अंदरसूल येथे जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांच्या स्वागतासाठी तेथील मराठा बांधवांची मोठी गर्दी उसळली होती. जरांगे यांनी यावेळी राज्यात नवे सरकार स्थापन झाल्यानंतर आंतरवाली सराटीत सामूहिक उपोषण सुरू करण्याचाही इशारा दिला. त्यासाठी मराठा समाजाच्या नागरिकांना त्यांनी मोठ्या संख्येने आंतरवालीत येण्याचे आवाहन केले.

## शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना शिंदे, फडणवीस, अजित पवार कारणीभूत - सतेज पाटील



**कोल्हापूर :** कोल्हापूर येथे महाविकास आघाडी व काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांची सभा आयोजित करण्यात आली होती. ही सभा गांधी मैदान येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी सभेत बोलताना सतेज पाटील यांनी महायुतीवर जोरदार निशाणा साधला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार कारणीभूत असल्याचा आरोप सतेज पाटील यांनी केला आहे.

सतेज पाटील सभेत बोलताना म्हणाले, राज्यामध्ये महागाईने कंबरडे मोडले आहे. (प्रियांका गांधी) या मैदानामध्ये उत्स्फूर्तपणे स्वागत होत आहे. १९७६ मध्ये काळम्मावाडी धरणाचे लोकार्पण करण्यासाठी इंदिरा गांधी या ठिकाणी आल्या होत्या आणि आम्ही सुद्धा त्याच धरणातून कोट्यवधींचे प्रकल्प गुजरातला नेले आहेत आणि विद्यार्थ्यांची सुद्धा आंदोलने झाली आणि महायुतीच्या काळामध्ये राज्यातील इतिहासामध्ये सर्वाधिक आंदोलन झाले. तसेच राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार कारणीभूत असल्याचा आरोप सतेज पाटील यांनी लावला आहे.

प्रियंका गांधी यांच्याविषयी बोलताना सतेज पाटील म्हणाले, इंदिरा गांधींची मध्यरात्री सभा ज्या ठिकाणी झाली होती, लोकांनी उत्स्फूर्तपणे त्यांचे स्वागत केले होते आणि आजही त्याच पद्धतीने तुमचे कोल्हापूरसाठी पाणी देत असल्याचे सतेज पाटील म्हणाले.

सतेज पाटील पुढे म्हणाले, आम्ही फुले,शाहू, आंबेडकरांचा वारसा पुढे घेऊन जात आहोत. महाविकास आघाडीचे कार्यकर्ते हे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. राज्यात फोडाफोडीचे राजकारण होत असताना ही निष्ठावंतांची फळी आपल्या स्वागतासाठी उभी असल्याचे ते म्हणाले. महिलांचा सन्मान न करण्याची प्रवृत्ती दिसून येत आहे. यांना जागा दाखवून देण्याची वेळ आली असल्याची टीका पाटील यांनी केली.

दरम्यान, प्रियंका गांधी यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्याविषयी राहुल गांधी यांनी बोलावे अशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची इच्छा आहे यावर प्रतिक्रिया दिली आहे. प्रियंका गांधी म्हणाल्या, बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना व काँग्रेस पक्षाची विचारधार वेगळी आहे पण बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल काँग्रेस पक्षाला नितांत आदर आहे. तसेच काँग्रेसचा कोणताही नेता छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान कदापी सहन करणार नाही, असेही ठणकाऊन सांगितले.

## आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना पाडा - छगन भुजबळांचा मनोज जरांगे यांच्यावर खोचका टोला

**येवला :** मराठा आंदोलक यांनी शनिवारी ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्या येवला मतदारसंघात सभा घेऊन मराठा समाजाला विरोध करणाऱ्या दोघांना निवडणुकीत पाडण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी कुणाचे नाव घेतले नाही. पण त्यांचा रोख मंत्री छगन भुजबळ व त्यांचे पुतणे समीर भुजबळ यांच्याकडे होता हे स्पष्ट आहे. या नंतर मंत्री छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषद घेत मनोज जरांगेंच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे.

छगन भुजबळ म्हणाले, मनोज जरांगे बोलले आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना पाडा, ते म्हणणे पण बरोबर आहे. त्याला कारण असे आहे, शरद पवार, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, उध्दव ठाकरे, अजित पवार आम्ही कोणी मराठा आरक्षणाला विरोध केलेला नाही, त्यामुळे तो प्रश्नच येत नाही, अशी प्रतिक्रिया छगन भुजबळ यांनी दिली आहे.

मनोज जरांगे यांनी येवल्याला पवित्र करा, असे देखील आवाहन केले होते. यावर बोलताना छगन भुजबळ म्हणाले, तुम्हाला कोणी सांगितले आमचा येवला अपवित्र आहे, येवला पहिल्यापासून पवित्रच आहे. १८५७ च्या स्वातंत्र्यसेनानी लढ्यात सहभागी सेनापती तात्या टोपे हे येवला येथे जन्मले होते. जगदंबा माता मंदिर, शनी मंदिर, मारुती मंदिर याशिवाय अनेक मंदिरे या येवला येथे आहेत. येवल्यातील लोक कीर्तन, भजन देखील करतात, अतिशय पवित्र असे आमचे शहर आहे, असे भुजबळ म्हणाले.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, येवला मतदारसंघातील प्रत्येक गटात मला उत्स्फूर्त व चांगला प्रतिसाद मिळत आहे, मोठी गर्दी प्रत्येक प्रचारसभेला होत आहे. ज्याला जे बोलायचे ते तो बोलत राहील, आपण आपले काम सुरू ठेवायचे. मला ते माहित नाही ते नक्की काय बोलले. पण, ठीक आहे, कधी कधी जुने ते सोने असेही म्हणतात लोक. असा टोला देखील भुजबळ यांनी लगावला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १७ नोव्हेंबर २०२४


## किशोर चे संपादक किरण केंद्रे यांच्या हस्ते होणार तिफण कविता महोत्सवाचे उदघाटन



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यासह राज्यातील नवप्रतिभावंताचा शोध घेवून त्यांना काव्यलेखनासाठी प्रेरणा मिळावी, हक्काचे व्यासपीठ मिळून त्यांना भोवतालच्या सामाजिक वास्तवाचे, ग्रामीण जीवन व संस्कृतीचे भान यावे, तसेच ग्रामीण भागात वाङ्मयीन, सांस्कृतिक चळवळ वृद्धिंगत व्हावी या उद्देशाने त्रैमासिक तिफण व भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड यांच्या वतीने कन्नड तालुक्यातील ग्रामीण भागात राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. हे सातवे वर्ष असून या वर्षी हा कविता महोत्सव मेहेगाव येथील भगवानगडावर कविवर्य लक्ष्मण महाडिक यांच्या अध्यक्षतेखाली जानेवारी च्या पहिल्या आठवडयात संपन्न होणार आहे.

या कविता महोत्सवाचे उदघाटन महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ ,पुणे बालभारतीच्या किशोर मासिकाचे कार्यकारी संपादक किरण केंद्रे यांच्या हस्ते होणार आहे. कविता महोत्सवाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विजय भोसले, अॅड. कृष्णा जाधव, संशोधन परिषदेचे राज्य अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकित ही निवड झाल्याची माहिती कविता महोत्सवाचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे, स्वागताध्यक्ष गणेश घुगे, परिषदेचे शाखाध्यक्ष प्रविण दाभाडे, सचिव अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, यांनी दिली.

किरण केंद्रे हे बालसाहित्याचे अभ्यासक व साहित्यिक, संपादक असून ते काव्यलेखनही करतात. किशोर मासिकाचे डिजिटलायजेशन करून त्यांनी किशोरचा चेहरा मोहरा बदलला आहे. किशोरच्या माध्यमातून अनेक बाल साहित्यिकांना त्यांनी संधी दिली आहे. मुलांचे सर्वात आवडते व लाडके मासिक म्हणून किशोरची ओळख आहे. यापूर्वी त्यांनी काही काळ लोकराज्य चे कार्यकारी संपादक म्हणूनही काम पाहिले आहे. कन्नड सारख्या ग्रामीण भागात किशोरचे संपादक प्रथमच येत असल्यामुळे या कविता महोत्सवात रंगत येणार असून त्यामुळे आगामी काळात बालसाहित्याची चळवळ ही गतिमान होईल. बैठकिस प्रा. रंगनाथ लहाने, डॉ. रामचंद्र झाडे, संदीप ढाकणे,भीमराव सोनवणे, श्रीराम दापके, लक्ष्मण वाल्डे, संदीप वाकडे, शिवनाथ गायकवाड, अनिता राठोड, शुभदा देवरे यांची उपस्थिती होती. या कविता महोत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन संयोजन समितीतर्फे करण्यात आले आहे.

## हाडांचे आरोग्य सांभाळण्यासाठी वजन व व्यायाम नियंत्रित हवा-डॉ. श्रीकृष्ण जोशी यांचा ज्येष्ठ नागरिकांना सल्ला




**जालना, (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** - पचण्यायोग्य आहार, आवश्यक तेवढाच व्यायाम आणि शरीराचे वजन नियंत्रित ठेवल्यास हाडांचे आरोग्य सांभाळता येईल. शिवाय सांधेदुखीपासूनही स्वत:ला दूर ठेवता येईल , असा मौलिक सल्ला पुणे येथील लोकमान्य हाॅस्पिटलचे मेडिकल डायरेक्टर डॉ. श्रीकृष्ण जोशी यांनी दिला.

जालना ज्येष्ठ नागरिक मंचतर्फे गुरुवारी सायंकाळी शहरातील भाग्यनगरस्थित मराठा सेवा संघाच्या सभागृहात आयोजित दिपावली स्नेहमिलन व विशेष व्याख्यान कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. मंचचे अध्यक्ष तुळशीराम पा.शेळके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास उपाध्यक्ष अंकुशराव राऊत, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. रावसाहेब ढवळे, कोषाध्यक्ष के. बी. मिसाळ, सचिव प्रा. राजकुमार बुलबुले व सहसचिव काकासाहेब खरात यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्याहस्ते जिजाऊ वंदन करण्यात आले. कार्यकारिणी सदस्य बाळकृष्ण शहापूरकर यांनी डॉ. जोशी यांचा तर सहसचिव काकासाहेब खरात यांनी लोकमान्य हॉस्पिटलचे समुपदेशक सचिन पवार यांचा यथोचित सत्कार व स्वागत केले. आपल्या सुमारे दीड तासाच्या व्याख्यानात डॉ. श्रीकृष्ण जोशी यांनी ज्येष्ठांना सर्वाधिक भेडसावणाऱ्या सांधेदुखी व हाडांचे विविध आजार याविषयी प्रात्यक्षिकांसह सखोल मार्गदर्शन केले. जीवनशैलीत काळानुरुप बदल स्वीकारुन सकारात्मक मानसिकता घडविणे, अनावश्यक गोळ्या व इंजेक्शन्स टाळणे, आहार - विहाराबाबत काळजी घेणे, शरीर प्रकृतीला आवश्यक व्हिटॅमिन्सबद्दल सजग रहाणे इ. विषयी त्यांनी विविध दाखले देत ज्येष्ठांना त्याचे महत्व पटवून देऊन सतर्क बनविले.

शेवटी ज्येष्ठ नागरिकांच्या विविध प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन त्यांचे शंका समाधानही केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय मंचचे संस्थापक उपाध्यक्ष श्री लक्ष्मिकांत कंकाळ यांनी करून दिला. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. रावसाहेब ढवळे यांनी केले. मंचचे अध्यक्ष तुळशीराम पा. शेळके यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यकारिणी सदस्य प्रकाशराव गढवे यांनी आभार प्रदर्शन केले. ज्येष्ठ नागरिक बंधु - भगिनींची यावेळी मोठी उपस्थिती होती. अल्पोपहार व चहापानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## धर्म आणि जातीवर निवडणुका लढवणे हे नामर्दाचे लक्षण: बच्चू कडू

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात परिवर्तन आघाडीने देखील आपले उमेदवार उतरवले आहेत. आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेकडून धनंजय गावडे यांना नालासोपारा विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्या प्रचारार्थ बच्चू कडू यांनी विरार येथे सभा घेतली होती. यावेळी त्यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. जाती धर्माच्या नावावर निवडणूक लढवणे हे नामर्दाचे लक्षण असल्याची टीका बच्चू कडू यांनी केली आहे.

विरारच्या सभेत बोलताना बच्चू कडू यांनी वसई विरार येथील स्थानिक आमदारावर तसेच सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, देशाच्या आर्थिक राजधानीच्या बाजूला असलेल्या या भागात अद्याप पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. हे दुर्दैव आहे. नालासोपारा विधानसभा निवडणुकीसाठी विद्यमान आमदार क्षितिज ठाकूर गटासाठी इतर उमेदवार मॅनेज केले गेले आहेत. ते एक्का-दुकी आहेत, त्यांनी प्रहारचा उमेदवार धनंजय गावडे याला खरी लढत देणारा उमेदवार म्हणले आहे, असे बच्चू कडू म्हणाले.

पुढे बोलताना बच्चू कडू यांनी भाजपवर टीका केली आहे. ते म्हणाले, धर्म हा निवडणुकीचा मुद्दा असू शकत नाही. केंद्र आणि राज्यात असताना धर्म जातीवर राजकारण करणे योग्य नाही. येथे जगण्यासाठी संघर्ष करणाऱ्या लोकांना 'बटेंगे तो कटेंगे' असे म्हणणे योग्य नाही. जनता आता जागरूक झाली आहे आई या व्यवस्थेविरोधात आवाज उठवत असल्याचे बच्चू कडू म्हणाले. धर्म आणि जातीवर निवडणुका लढवणे हे नामर्दाचे लक्षण आहे. भाजपने आपल्या कामावर निवडणुका लढवाव्यात, अशी टीका कडू यांनी केली आहे.

बच्चू कडू म्हणाले, निवडणूक आयोग हा लोकशाहीचा आत्मा आहे, परंतु सध्या तो पक्षपातीपणा करत आहे. उद्धव ठाकरे यांच्या बॅग तपासणीच्या घटनेवरून हे स्पष्ट होते. पुढे ते म्हणाले, गरिबांना रेशन दुकानातून स्वस्त कांदा द्याव, अशी मागणी त्यांनी केली. सरकार महागाई वाढवून मिळालेली रक्कम परत देत आहे, असे म्हणत त्यांनी सरकारच्या लाडकी बहीण योजनेवर टीका केली आहे.

## भाजपला पाठिंबा दिल्याने वंचितच्या कार्यकर्त्यांची अपक्ष उमेदवाराला मारहाण

**बीड :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी अपक्ष उमेदवाराला काळे फासत मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. वंचितला पाठिंबा दिलेल्या अपक्ष उमेदवाराने भाजपला पाठिंबा दिल्याने वंचितचे कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.

वंचित बहुजन आघाडीचे शैलेश कांबळे यांनी अपक्ष उमेदवार सचिन चव्हाण यांना काळे फासत मारहाण करण्यात आली आहे. सचिन चव्हाण यांना काळे फासत शैलेश कांबळे म्हणाले, सचिन चव्हाण यांनी जो काही प्रकार केला आहे याचा आम्ही निषेध करतो. बाळासाहेब आंबेडकरांना धोका या सचिन चव्हाण याने दिला आहे, असे म्हणत शैलेश कांबळे यांनी चाबकाने मारहाण केली आहे.

अपक्ष उमेदवार सचिन भीमराव चव्हाण यांनी सुरुवातीला वंचित बहुजन आघाडीला विधानसभा निवडणुकीसाठी पाठिंबा जाहीर केला होता. मात्र त्यांनी हा पाठिंबा काढून घेत आता भाजपला पाठिंबा दिला आहे. त्यांच्या या बदललेल्या भूमिकेमुळे वंचितचे कार्यकर्ते आक्रमक झाले. त्यातून शैलेश कांबळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत सचिन चव्हाण यांच्या तोंडाला काळे फासले. तसेच बाळासाहेब आंबेडकरांना धोका दिला म्हणत त्यांनी सचिन चव्हाण यांना चाबकाने फटके मारले असल्याचे समोर आले आहे.

विधानसभा निवडणूक आता काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे राज्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राज्यातील सर्वच भागांमध्ये राजकीय पक्षांकडून उमेदवाराच्या प्रचारासाठी सभा आयोजित करण्यात येत आहेत. तसेच इतर पक्षांकडून व अपक्ष उमेदवारांकडून देखील पाठिंबा मिळवण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडी प्रयत्न करत आहे. तसेच निवडणुकीच्या रिंगणात आता तिसरी आघाडीने देखील उडी घेतली आहे. आमदार बच्चू कडू, छत्रपती संभाजीराजे व राजू शेट्टी यांनी मिळून तिसरी आघाडी स्थापन केली आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीचा निकाल काय लागणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १७ नोव्हेंबर २०२४

## मग निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहिण योजना का? - प्रियांका गांधी



**अहिल्यानगर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना जातनिहाय जनगणना करायला लावावे, असे आव्हान काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी यांनी दिले आहे. प्रियांका गांधी यांची महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पहिली सभा अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी मध्ये झाली. या वेळी प्रियांका गांधी यांनी राज्य तसेच केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला.

बाळासाहेब ठाकरे आणि करण्याचे काम केले असल्याचे प्रियांका गांधी यांनी म्हटले आहे.

राज्यात मोठ्या प्रमाणात महागाई वाढलेली आहे. तर दुसरीकडे टॅक्सच्या माध्यमातून राज्यातील जनतेकडून पैसा वसून केला जात आहे. निवडणुका आल्यानंतर लाडकी बहिण योजना यांचे विचार वेगळे आहेत. मात्र त्यांच्याविषयी कायमच मनात आदर असल्याचे प्रियांका गांधी यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रातील अनेक उद्योग इतर राज्यात पाठवले. यावरून देखील प्रियांका गांधी यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला. महाराष्ट्रातील अनेक उद्योग मागील दहा वर्षात दुसऱ्या राज्यात गेले असल्याचा आरोप प्रियांका गांधी यांनी केला. मागील दहा वर्षांपासून राज्यात भाजपचे सरकार आहे. त्यांनी महाराष्ट्राला कमजोर लागू करण्यात आल्याचा आरोप प्रियांका यांनी केला. या योजनेच्या माध्यमातून महिलांच्या हातात पंधराशे रुपये टेकवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. निवडणूक आली की तीन-चार महिने आधी लाडक्या बहिणीच्या माध्यमातून पंधराशे रुपये दिले गेले

आणि महिला आम्हाला मतदान करतील असे त्यांना वाटत आहे. मात्र बहिणींनी लक्ष्यात ठेवावे, अडीच वर्षापासून राज्यात यांचे सरकार आहे. तर दहा वर्षापासून केंद्रातही यांचेच सरकार आहे. असे असताना आताच पैसे का दिले जात आहेत? असा प्रश्न प्रियांका गांधी यांनी उपस्थित केला.

देशभरातील शेतकरी आज संकटात सापडला असल्याचा आरोप प्रियांका गांधी यांनी केला आहे. कापसाला, सोयाबीनला भाव मिळत नाही. दुसरीकडे तुम्ही शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा करत आहात. कांदा उत्पादक शेतकरी आज त्रस्त आहे. कांद्यावर निर्यात बंदी लावला आणि कांद्याचे भाव पाडण्यात आले. दुसरीकडे कापूस आयात करून कापसाचे भाव देखील पाडण्यात आले असल्याचा आरोप प्रियांका गांधी यांनी केला आहे. आणि दुसरीकडे शेतकऱ्यांची प्रगती करणार असल्याचा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. ते कोणत्या तोंडाने शेतकऱ्यांना हे बोलत आहेत? असा सवाल प्रियांका गांधी यांनी उपस्थित केला.

## अमित शहांची झारखंडसाठी घोषणा - सरपंचांचा पगार ५००० रुपये



**गिरिडीह :** झारखंडमध्ये २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातील निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आहे. शनिवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दुमका येथे जाहीर सभा घेतली. ते म्हणाले- दिल्लीतील सरायकेला खान चौकात बिरसा मुंडा यांचा पुतळा बसवला, हेमंत सोरेन विरोध करत आहेत. त्यांना पोटात दुखत आहे.

ते म्हणाले- ते (हेमंत) म्हणतात फक्त पुतळा बसवून काय होईल. आज हिशोब देण्यासाठी आलो आहोत. आमचे नेते नरेंद्र मोदी यांनी आदिवासी गौरव दिन करण्याचे काम केले. मोदीजींच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली जात आहे, जी आदिवासी गौरव वर्ष म्हणून काम करेल.

ते म्हणाले- काँग्रेस सरकारमध्ये तुम्ही झारखंडसाठी संघर्ष करत असतानाही तुमच्यावर लाठीचार्ज झाला होता. काँग्रेसने तुम्हाला तुमचे अधिकार दिले नाहीत. आज हेमंत सोरेन सत्तेसाठी त्याच काँग्रेस आणि राजदच्या मांडीवर बसले आहेत. झारखंडच्या उभारणीचे काम भाजपचे अटलबिहारी वाजपेयी यांनी केले आणि त्याचे सौंदर्यीकरण करण्याचे काम नरेंद्र मोदी करत आहेत.

गृहमंत्री म्हणाले- हेमंत सोरेन आणि त्यांच्या सरकारकडून बांगलादेशींना प्रोत्साहन दिले जात आहे. हेमंतबाबूंची उलटी गिनती सुरू झाली आहे. मी आदिवासी मुलींना आणि ओबीसी बांधवांना सांगतोय की ज्यांनी जमिनी घेतल्या आहेत त्यांना उलटे टांगून सरळ करू. आपले काही होणार नाही, असे भ्रष्ट नेत्यांना वाटते. मी म्हणतो- ठीक आहे २३ तारखेपर्यंत साजरा करा. यातून प्रत्येक पाई वसूल करून झारखंडच्या तिजोरीत भरली जाईल.

शहा यांनी दुमका रॅलीत मोठी घोषणा केली. ते म्हणाले- राज्यातील विस्थापित कुटुंबांचे पुनर्वसन सुनिश्चित केले जाईल. आमचे सरकार आले तर प्रमुखाचा पगार पाच हजार रुपये होईल. हेमंत सरकारच्या सर्व भ्रष्ट लोकांना तुरुंगात पाठवेल.

यूसीसीमुळे आदिवासींना कोणतीही अडचण येणार नाही, असे शहा म्हणाले. आमचे सरकार त्याची अनेक प्रकारे अंमलबजावणी करेल. हेमंत सोरेन यांना आम्ही आमच्या कार्यकाळात मुस्लिमांना आरक्षण देऊ देणार नाही. झारखंड श्रीमंत आहे पण झारखंडी गरीब आहे. काल येथे एकही कारखाना सुरू झाला नाही. राज्यात उद्यापासून तरुणांना नोकऱ्या मिळतील, यासाठी कारखाने सुरू होतील, अशी मोदींची हमी आहे. स्थलांतर करण्याची गरज भासणार नाही.

## फटाके एवढे फोडा की, त्याचा आवाज बांद्रापर्यंत पोहोचला पाहिजे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**रत्नागिरी :** कोकण आणि शिवसेना यांना कोणीही वेगळे करू शकत नाही. कोकणातील माणसे ही बाहेरून काटेरी आणि आतून गोड आहेत. त्यामुळे येथील माणसे विरोधकांचा करेक्ट कार्यक्रम करणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. महायुतीचे उमेदवार योगेश कदम यांच्या प्रचारासाठी रत्नागिरी येथे मुख्यमंत्री शिंदे यांची सभा आयोजित करण्यात आली होती. या वेळी त्यांनी युतीच्या उमेदवारांसाठी मतदारांना आवाहन केले.

बाळासाहेब ठाकरे यांचा भगवा झेंडा हातात घेऊन योगेश कदम हे उभे आहेत. त्यामुळे येणाऱ्या २३ तारखेला योगेश कदम यांचाच गुलाल उधळायचा असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले. आहे. फटाके एवढे फोडा की, त्याचा आवाज बांद्रापर्यंत पोहोचला पाहिजे, अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला. आता रत्नागिरीमध्ये २३ तारखेला गुलाल उधळणार आहे, दिवाळी साजरी करायची असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

दापोलीमध्ये आपल्याला विकासाची गंगा आणायची आहे. साडेतीन हजार कोटी रुपयांची विकास कामे आपल्या सरकारने येथे केली आहेत. मात्र यापूर्वीचे मुख्यमंत्री भेटतच नव्हते, त्यामुळे निधी मिळणार कुठून? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मात्र आता घेणारे सरकार नाही तर देणारे सरकार आहे. राज्यांमध्ये आधीच महायुतीचे सरकार स्थापन व्हायला हवे होते. मात्र उद्धव ठाकरे हे काँग्रेसच्या मांडीवर जाऊन बसले, अशा शब्दात एकनाथ शिंदे यांनी निशाणा साधला.

आम्ही कोणालाही घाबरत नाही. कोणाला धमक्या देत आहात? असा प्रश्न एकनाथ शिंदे यांनी उपस्थित केला. आमची नियत साफ आहे. मतदान झाल्यानंतर लाडकी बहीण योजनेचे डिसेंबरचे पैसे देखील महिलांच्या खात्यात जमा होतील, असे आश्वासन देखील यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.

## आम्ही बनवलेल्या कॉलेजमध्ये शिकून विचारतात काय केले? - खरगे

**जामतारा/खिजरी :** काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी शनिवारी झारखंडमधील जामतारा येथे निवडणूक रॅली घेतली. ते म्हणाले- आम्ही (काँग्रेस सरकारने) बनवलेल्या कॉलेजमध्ये शिकून आज लोक विचारतात की, काँग्रेसने ७० वर्षांत काय केले?

काँग्रेस अध्यक्ष म्हणाले- आजचे भाजपचे सर्व लोक नेहरूजींनी बांधलेल्या शाळांमध्ये शिकले आहेत. आम्ही हे केले नसते तर मोदीजी तुम्ही त्या खुर्चीवर बसले नसते. या देशाला आम्ही संविधान दिले. म्हणूनच तुम्ही पंतप्रधान झालात. माझे वडीलही गिरणी कामगार होते. मी कायद्याचा अभ्यास केला. आज मी काँग्रेसचा अध्यक्ष आहे. कोणामुळे, संविधानामुळे.

ते म्हणाले- ते (भाजप) काँग्रेसला विचारतात, त्यांनी देशासाठी काय केले? आम्ही देशाला इतके धान्य भरले की गोदामे भरली. तुम्ही म्हणता की काँग्रेस पक्षाने ७० वर्षात देश उद्ध्वस्त केला आहे. आणि तुम्ही ते ११ वर्षात उध्वस्त केले. आम्ही ५५ वर्षात सर्वकाही आणले. आयआयटी, एम्स. आम्ही बनवलेल्या कॉलेजमध्ये भाजपचे लोक आहेत.

खरगे म्हणाले- मोदीसाहेब, संविधानामुळे तुम्ही चहा विकून पंतप्रधान झालात. म्हणूनच आम्ही म्हणतो संविधान वाचवा, लोकशाही वाचवा. संविधान वाचले तरच सर्वांना अधिकार मिळतील. संविधान टिकले नाही तर कुणालाही अधिकार मिळणार नाहीत.

खरगे म्हणाले - तुमच्या पूर्वजांना विचारा की त्यांना ७५-८० वर्षांपूर्वी मतदानाचा अधिकार होता का? आधी मतदानाचा अधिकार वयाच्या २१व्या वर्षी होता, मग आपल्या राजीव गांधींनी वयाच्या १८व्या वर्षी मतदानाचा अधिकार दिला. तरुणांना मतदानाचा हक्क देण्यात आला.

खरगे म्हणाले- मोदीसाहेब, संविधानामुळे तुम्ही चहा विकून पंतप्रधान झालात.

आम्ही पंचायत निवडणुका आणल्या. काँग्रेस नेहमीच दस्तूर लिहीत आली आहे. संविधान लिहा. पण मोदी साहेब फक्त बोलत राहतात. त्यामुळे असे बोलणाऱ्यांना मत देऊ नका. आमच्या गरिबांचे नेते इरफान अन्सारी यांना विजयी करा. संविधान वाचवण्याचा हा एकमेव मार्ग आहे.

